खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com



वर्ष : ०६ | अंक : ९२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१४ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

विलीनीकरणावर कोणतीही चर्चा नाही, राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१२, पुणे : दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना प्रचंड उधाण आलं आहे. विशेष म्हणजे खासदार सुप्रिया सुळे यांनी विलीनीकरणाचा प्रश्नावर पूर्णविराम दिल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.

असं असताना दिल्लीत सुप्रिया सुळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्यात बैठक झाल्याचं वृत्त काही माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने दिलं. यानंतर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी या वृत्ताचं खंडन केलं आहे. खोटे नॅरेटीव्ह सेट करून स्वत:चा राजकीय अजेंडा सेट करण्यासाठी माध्यमांचा वापर करणाऱ्या तथाकथित सूत्रांवर किमान आतातरी विश्वास ठेऊ नये, असं आवाहन उमेश पाटील यांनी केलं आहे.

गेल्या आठवडाभरापासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या बातम्या तथाकथित सूत्रांच्या हवाल्याने प्रसारित केल्या जात होत्या. मात्र विलिनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा सुरू नाही. ना औपचारिक, ना अनौपचारिक, ना आमच्या बाजूने, ना त्यांच्या बाजूने. हे आम्ही वारंवार स्पष्ट केलं आहे, असं उमेश पाटील यांनी स्पष्ट केलं आहे.

'आमदार आपल्या नेतृत्वाची नाही तर कुणाची भेट घेणार?', उमेश पाटलांचा सवाल

सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री आहेत. त्या पुण्यात असताना पक्षाचे आमदार, पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते त्यांना भेटायला जाणे अत्यंत स्वाभाविक आहे. मतदारसंघातील विकासकामे, जिल्हा नियोजन समितीचे विषय, मंत्रालयात प्रलंबित असलेली कामे यासाठी आमदार आपल्या नेतृत्वाची भेट घेणार नाहीत, तर कोणाची घेणार?, असा सवाल उमेश पाटील यांनी केला.

अशा नियमित भेटींनाही वेगळा राजकीय रंग देऊन 'पार्थ पवार यांनी आमदारांची बैठक बोलावली' अशा बातम्या प्रसारित केल्या जातात. यामागे नेमका कोणाचा अजेंडा आहे?, असा प्रश्नही उमेश पाटील यांनी उपस्थित केला आहे.

हा आमच्या अन्याय नाही का? उमेश पाटील यांचा सवाल

खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनीही विलिनीकरणाचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे आणि त्यासंदर्भात चर्चा सुरू नसल्याचे स्पष्ट केले आहे. मग गेल्या आठवडाभरात या बातम्या माध्यमांना नेमक्या कोणी पुरवल्या? आम्ही सुरुवातीपासून सांगत असलेली वस्तुस्थिती दुर्लक्षित करून तथाकथित सूत्रांच्या माहितीवर विश्वास ठेवणे, हा आमच्या पक्षावर अन्याय नाही का?, असादेखील प्रश्न उमेश पाटील यांनी केला आहे.

सूत्रांपासून सावध राहण्याचं आवाहन

काही मंडळी स्वतःचा छुपा राजकीय अजेंडा आणि व्यक्तिगत राजकीय हितसंबंध साधण्यासाठी माध्यमांचा वापर करून घेत आहेत का, याचा शोध आता माध्यमांनीच घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे इथून पुढे माध्यमांनी अशा अविश्वसनीय सूत्रांपासून सावध राहावे, एवढीच आमची अपेक्षा आहे, असंही आवाहन उमेश पाटील यांनी केलं आहे.



मिरा भाईंदर महानगरपालिका महासभेवरील जाचक SOP तात्काळ रद्द करा



अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.१३, मीरा-भाईंदर : मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेसाठी तयार करण्यात आलेल्या जाचक SOP चा विरोधी पक्षनेत्या सय्यद आफरीन मुझफ्फर हुसेन यांनी सभागृहात तीव्र निषेध व्यक्त करत SOP ची प्रत फाडली. महासभा हे जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करणारे लोकशाहीचे व्यासपीठ आहे. त्यामुळे महासभेत उपस्थित राहण्यासाठी सर्वसामान्य नागरिक आणि पत्रकारांवर कठोर निर्बंध लादणे चुकीचे आहे. महासभेतील कामकाज पारदर्शक असणे आणि नागरिकांना शहराच्या निर्णय प्रक्रियेची माहिती मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

माझी ठाम मागणी आहे की जाचक SOP तात्काळ रद्द करून महासभा सर्वसामान्य नागरिक आणि पत्रकारांसाठी खुली करावी तसेच महासभेचे नियमित लाईव्ह प्रक्षेपण करण्यात यावे. अशी मागणी मागणी विरोधी पक्षनेत्या, मीरा-भाईंदर महानगरपालिका यानी केली आहे.

कामगारांच्या हिताला व सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१३, कोरपना (चंद्रपूर) : तालुक्यातील नारंडा येथील दालमिया सिमेंट (भारत) कारखान्यातील काम गारांच्या विविध प्रलंबित समस्यांच्या सोडवणुकीसाठी ११ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित बैठकीनिमित्त आमदार देवराव (दादा) भोंगळे यांनी प्लांट परिसराला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कारखान्यातील ओ. अँड एम. सप्लाय वर्कर, जॉब वर्कर तसेच संयुक्त श्रमिक प्रतिनिधी मंडळाच्या कामगारांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर दालमिया सिमेंटचे युनिट हेड प्रणव नायक, एच. आर. हेड अभय सिंग ठाकूर आणि कामगार प्रतिनिधींच्या उपस्थितीत प्रलंबित जवळपास ३१ प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कारखान्यात उत्पादन सुरू होऊन ५ वर्षे पूर्ण झाली असतानाही लागू नियमांनुसार वेज बोर्ड लागू न होणे, नियमानुसार २० टक्के बोनस किंवा एक महिन्याचे वेतन न मिळणे, महागाई भत्ता (व्हीडीए), किमान वेतनवाढ आणि ग्रेड न मिळणे, या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली.

तसेच कारखान्यातील प्रचंड धूळ व रासायनिक प्रदूषणामुळे कामगारांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता डस्ट व हेल्थ अलाउन्स, आवश्यक सुरक्षा साधनांची उपलब्धता, पी.एफ.व इ.एस.आय.सी.ची कपात होऊनही संबंधित रक्कम वेळेवर जमा न होणे, अपघातग्रस्त कामगारांना योग्य भरपाई न मिळणे, स्वच्छ पिण्याचे पाणी, विश्रामगृह, कॅन्टीन व शौचालय यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आदी प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून काम गारांची सुरक्षा व हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश आ.भोंगळे यांनी यावेळी दिले.

याशिवाय पूर्व-मुरली परिसरातील कामगारांना भरती प्रक्रियेत प्राधान्य देणे, कारखान्यातील धुळीमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची भरपाई देणे तसेच, सी.एस. आर. अंतर्गत दत्तक घेतलेल्या गावांमध्ये आरोग्य व पायाभूत सुविधांचा विकास करणे, या मागण्याही यावेळी मांडण्यात आल्या.

सदर बैठकीला भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, भाजपा तालुकाध्यक्ष संजय मुसळे, तालुका महामंत्री सतीश उपलेंचवार, पुरुषोत्तम भोंगळे, कामगार प्रतिनिधी सुनील टोंगे, रमेश वेट्टी, प्रदीप पारखी, गुरुदास वराडे, संजय मोरे, सुदर्शन चव्हाण आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

गोंदियातील मांग गारुडी समाजाच्या ३० विद्यार्थ्यांचा मुंबई दौरा

राज्यपालांची घेतली भेट ; प्रथमच समुद्र पाहून मुले अचंबित

अक्षराज : जे. के. पोळ

दि.१३, मुंबई : गोंदिया जिल्ह्यातील कुडवा येथे पालावरच्या शाळेत शिकणाऱ्या भटक्या विमुक्त जमातीतील उपेक्षित, वंचित मांग गारुडी समाजाच्या ३० मुलामुलींनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन येथे भेट घेतली व राज्यपालांशी मनमोकळ्या गप्पा केल्या.

रोजगारासाठी पालकांच्या होणाऱ्या स्थलांतरामुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी विदर्भात अनेक ठिकाणी पालावरची शाळा चालविणाऱ्या भटके विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र व भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, विदर्भ प्रांत यांच्या वतीने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबईत आपण नेहरू विज्ञान केंद्र, सिद्धिविनायक मंदिर, विधान भवन पाहिले परंतु आज येथून पाहिलेला समुद्रच सर्वांना खूप आवडला, अशी माहिती यावेळी मुलांनी राज्यपालांना दिली.

भटके विमुक्त विकास परिषद ही संस्था भटक्या विमुक्त जमातीतील मुलामुलींच्या शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना जीवनदान देण्याचे राष्ट्रकार्य करीत आहे असे गौरवोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले.



यावेळी राज्यपालांसमोर मांग गारुडी समाजातील ३० विद्यार्थ्यांनी भगवद्गीतेतील पंधरावा अध्याय पाठ म्हणून दाखवला. पाठांतर व उच्चाराबाबत राज्यपालांनी मुलांना कौतुकाची थाप दिली.

भटके विमुक्त जमातीतील मुलामुलींना परिषदेने शिक्षण व संस्कारांसोबत रोजगारोन्मुख प्रशिक्षण द्यावे अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. सर्वांनी शिक्षण घ्यावे, अभ्यास करावा व उत्तम भविष्य बनवावे असा सल्ला राज्यपालांनी यावेळी मुलांना दिला. पुढील सुट्ट्यांमध्ये आपण मुलामुलींना पुणे दर्शन घडविण्यासाठी सूचना करू, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

भटके विमुक्त जमातीतील पालकांचे रोजगारासाठी गोंदिया येथून छत्तीसगड, ओडिसा, हरियाणा, पंजाब व काश्मीरपर्यंत स्थलांतर होत असल्यामुळे त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहतात व बरेचदा व्यसनांच्या आहारी जातात. अशा मुलांसाठी पालावरची शाळा हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे शिक्षा आयाम प्रमुख प्रशांत सुरेश बोरसे यांनी राज्यपालांना दिली.

सर्व मुलामुलींना अभ्यास व शिस्तीसोबतच खर्रा न खाण्याची, जुगारासाठी पत्ते न खेळण्याची तसेच चांगले नागरिक होण्याची शपथ दिली जाते तसेच त्यांना भगवद्गीतेतील अध्याय शिकवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

मुलामुलींना दररोज खेळ खेळण्यासाठी तसेच आरोग्याची काळजी घेण्यास सांगितले जाते असे प्रशांत बोरसे व उर्मिला बोरसे यांनी सांगितले.

छटपूजा उत्सवासाठी ठाणे मनपा सज्ज; आयुक्तांनी घेतला आढावा



अक्षराज : जे. के. पोळ

दि.१३, ठाणे : १५ आणि १६ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या छटपूजा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. या उत्सवात महिलांसह मोठ्या संख्येने भाविक सहभागी होत असल्याने, हा उत्सव सुरळीत आणि सुरक्षित पार पाडण्यासाठी महापालिकेने विशेष नियोजन केले असून सर्व अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे अशा सूचना आज आयुक्त सौरभ राव यांनी पाहणी दरम्यान दिल्या आहेत.

छटपूजा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी महापालिका अधिकाऱ्यांसमवेत सर्व तलावांची पाहणी केली होती. त्यानुसार आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या होत्या.

आज झालेल्या पाहणी दौऱ्यास वागळे प्रभाग समिती अध्यक्षा एकता भोईर, नगर अभियंता सुरेंद्रकुमार काटकर, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, दीपक झिंजाड, वैभव आवारे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, प्र.मुख्य पर्यावरण अधिकारी विद्या सावंत, संबंधित कार्यकारी अभियंता, कर्मचारी उपस्थित होते.

रायलादेवी तलाव, उपवन तलाव (बनारस घाट) आणि मासुंदा तलाव (दत्तघाट व अहिल्यादेवी होळकर घाट) या प्रमुख ठिकाणांवर सुरळीत कामकाज पाहण्यासाठी उपआयुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांची सनियंत्रण अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच भाविकांच्या सोयीसाठी संबंधित मार्गांवर घाटांचे ठिकाण व अंतर दर्शवणारे फलक लावण्यात येणार आहेत.

सुरक्षेच्या दृष्टीने घाटांवर बॅरिकेटिंग, मंडप, स्टेज, बैठक व्यवस्था आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी रायलादेवी, मासुंदा व उपवन घाटावर ड्रोनची व्यवस्था करण्यात आली आहे. उत्सवापूर्वी तलाव व घाट परिसरात 'डिप क्लिनिंग ड्राईव्ह' राबवण्यात आला आहे. सर्व घाटांवर नियमित साफसफाई, निर्माल्य कलशांची व्यवस्था, कचरा संकलन, फिरती शौचालये आणि कचराकुंड्या उपलब्ध करून देण्यात आल्या असून संपूर्ण उत्सव काळात स्वच्छता व्यवस्था अखंडित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तलावांमधील पाण्याची शुद्धता आणि स्वच्छता राखण्यासाठी पाण्याच्या चाचण्या घेण्यात येत असून, प्रत्येक तलावावर प्रशिक्षित मनुष्यबळासह किमान दोन बोटींची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व पूजा स्थळांवर पुरेशी प्रकाश व्यवस्था, आपत्कालीन जनरेटर, सीसीटीव्ही आणि उद्घोषणा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी अग्निशमन दल, जल बचाव पथक, रुग्णवाहिका, वैद्यकीय पथक आणि सुरक्षारक्षक तीन पाळ्यांमध्ये तैनात ठेवण्यात आले आहेत. ठाणेकरांचा छटपूजा उत्सव आनंदात आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी महापालिकेची संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली असून अधिकारी व कर्मचारी पूर्णवेळ कार्यरत राहणार आहेत. तरी उत्सवासाठी येणाऱ्या भाविकांनी देखील महापालिका प्रशासनामार्फत देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.



वरातीमागे धावणारे घोडे

सगळीकडे असलेले दुष्काळाचे सावट, वाढलेली महागाई, फटाक्यांचे वाढीव दर बघता, यावेळी दिवाळीत आतषबाजी कमी होईल अशी अटकळ बांधली जात होती. फटाके विक्रेतेही चिंतेत होते. दिवाळीच्या महिना-पंधरा दिवसांपूर्वी नागपूर महानगरपालिकेने ८०० विक्रेत्यांना फटाकेविक्रीची परवानगी दिली. त्यात आवाजी, आकाशी अशा सगळ्याच फटाक्यांचा समावेश होता. त्यामुळे फटाक्यांच्या ठोक विक्रेत्यांनी, छोट्या विक्रेत्यांना फटाके विकले. छोट्यांनी ते लोकांना विकले. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी साडेसात वाजता फटाक्यांचा जो दणदणाट सुरू झाला, तो पहाटे तीन वाजेपर्यंत सुरू होता. कुणाच्या अंगणात, कुणाच्या गॅलरीत, कुणाच्या छतावर, कुठे रस्त्यावर, तर कुठे पुलावरदेखील फटाके फुटत होते. आकाशात जिकडे-तिकडे फटाक्यांच्या धुराचे साम्राज्य पसरले होते. जे बसक्या घरात राहतात त्यांना वाटत होते की, आपण जमिनीवर आहोत म्हणून आपली घरे धुराने भरली असतील. जे वरच्या मजल्यांवर राहत होते त्यांना वाटले की, आकाशी फटाके उंच उडून फुटतात म्हणून आपली घरे धुराने भरून गेली असावीत. जिकडे म्हणाल तिकडे, जिथे म्हणाल तिथे धुराचे साम्राज्य पसरले होते. हवेत फटाक्याच्या दारूचे कण असल्याने श्वास घेताना दारू नाकात जात असे. लहान मुलांना, ज्येष्ठांना त्याचा प्रचंड त्रास झाला. ज्यांना अस्थम्याचा त्रास आहे, त्यांची परिस्थिती वाईट झाली. कुणाला डोळ्यांना त्रास झाला. दुसऱ्या दिवशी श्वसनविकारतज्ज्ञांकडे, नेत्रविकारतज्ज्ञांकडे उपचारांसाठी रांगा लागल्या होत्या. हवेचा दर्जा तर सिव्हिल लाइन्ससारख्या परिसरातही बिघडला होता. असे यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणात झाल्याचे ज्येष्ठांनाही स्मरत नाही. यावर कहर केला तो आकाशी फटाक्यांनी. उडवणाऱ्यांनी ते उडविले, मात्र ते घुसले कुण्या तरी भलत्याच्या घरांत, दुकानांत. त्यामुळे आगी लागल्या. एकट्या नागपूर शहरात फटाक्यामुळे लागलेल्या आगीची संख्या ३८ इतकी मोठी होती.

जागोजागी होणाऱ्या प्रचंड आवाजाने चिमण्या कावळे, कुत्रे, मांजरीसह मुक्या प्राण्यांचे काय झाले असेल कुणाला माहीत! ज्यांना बोलता येत होते, त्यांनी दुसऱ्या दिवशी आवाज उठविला. तेव्हा शहरी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी ३० नोव्हेंबरपर्यंत आकाशात उडणारे रॉकेट, स्काय शॉट्स, एरियल शेल्स आणि तत्सम फटाके फोडण्यास मनाई केली. छत, गच्ची, बाल्कनी, अरुंद रस्ते, झोपडपट्टी परिसर, दाट लोकवस्तीची ठिकाणे, बाजारपेठा आणि वाहनतळ या भागातही फटाके फोडण्यावर निर्बंध लावण्यात आले. निर्बंध न पाळणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही दिला. आता मुख्य मुद्दा असा आहे की, छतावर, बाल्कनीत, अरुंद रस्त्यावर फटाके फोडणाऱ्यांवर लक्ष ठेवायचे कसे? ठेवले तर त्यांना पकडायचे कसे ? पकडणार तरी कोण? इतके कर्मचारी आहेत कुणाकडे? हे सारे प्रश्न अनुत्तरितच. जेव्हा-केव्हा काही तरी चुकीचे घडते, तेव्हा थोडा आवाज होतो. प्रशासन लगेच त्यावर बंदी घालते. ती घालताना बंदी मोडणाऱ्यांवर कारवाई कशी करायची कुणी करायची याचे ठोस नियोजन नसते. गणेशोत्सवामध्ये डीजेच्या आवाजावर बंदी घातली. दोन्ही बाजूंनी प्रतिक्रिया उमटल्या. बंदीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक यंत्रणा पोलिस उभारू शकले नाहीत. मंडळे किती, मिरवणुका किती, डेसिबल मोजणारी यंत्रे किती, याचा ताळमेळ नव्हता. अनेक मंडळांत डीजे वाजले. ते पोलिसांना दिसले. जाणवले. तुरळक कारवाया सोडल्या, तर बंदी फार प्रभावीपणे जाणवली नाही. मग अशी बंदी करायची तरी कशाला? आम्ही काही तरी करतोय हे दाखवायला? पतंगाच्या मांजाचेही तसेच आहे. मकरसंक्रांत येते, नायलॉन मांज्यावर बंदी असते. प्रशासन जप्तीच्या चार-दोन कारवाया करते. तरीही तो उपलब्ध होतो. दोघा-चौघांचे गळे कापतो. पुन्हा बंदीच्या चर्चा झडतात. संक्रांत संपते. चर्चाही संपते. फटाके बंदीचेही तसेच होणार असे दिसते. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर आदेश निघाले. थोडे फटाके भाऊबीजेला आणि काही पंचमीला फटतील. चार-दोन कारवाया होतील. दिवाळी संपेल आणि पुन्हा फटाकेबंदीचा आवाज बंद होईल.

- श्याम ठाणेदार

संबंधित घटकांची समृद्धताच ग्रंथालय समृद्धी !



जीवनात अमूल्य शिक्षणाला जे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व ग्रंथालयांनाही आहे. कोणत्याही काळात किंवा कोणत्याही परिस्थितीत ग्रंथालयांचे महत्त्व कमी झालेले नाही; उलट काळानुसार ते वाढतच गेले आहे. आपल्या भारतातील प्राचीन नालंदा आणि तक्षशिला या जगप्रसिद्ध विद्यापीठांची समृद्ध ग्रंथालये असोत किंवा आजच्या आधुनिक युगात साधनसंपन्न ज्ञानकेंद्रे म्हणून स्थापित झालेली डिजिटल ग्रंथालये असोत, शिक्षण आणि ज्ञानाचे प्रमुख स्रोत म्हणून सर्वत्र ग्रंथालयांचे महत्त्व अतुलनीय आहे. आज ग्रंथालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे, जेणेकरून वाचकांना जलद गतीने दर्जेदार ग्रंथालयीन सेवा पुरवता येतील. यामुळे वाचकांचा आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचा वेळ व श्रम वाचून ग्रंथालयशास्त्राच्या पाचही नियमांचे पूर्णपणे पालन होते.

ग्रंथालयांची निर्मिती व्यवसाय किंवा पैसा कमावण्याच्या उद्देशाने होत नाही; ती शिक्षणसेवा किंवा समाजसेवेच्या माध्यमातून लोककल्याणासाठी ज्ञानार्जनाची केंद्रे म्हणून केली जाते. आज सर्वत्र, प्रत्येक क्षेत्राला पैसा कमावण्याचे साधन बनवले गेले आहे. समाजसुधारकांनी समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून समाजसेवेचा भाग म्हणून शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालये स्थापन केली होती; मात्र काळानुसार त्यात बदल झाले आहेत. आज शिक्षणक्षेत्रातील बहुतांश संस्था देखील पैसा कमावण्याची केंद्रे बनली आहेत. परंतु ग्रंथालयांमधून उत्पन्नाचे चांगले स्रोत उपलब्ध नसल्यामुळे उद्योजक या क्षेत्रात विशेष रस घेत नाहीत. सर्वसामान्य लोकांसाठी सरकारद्वारे संचालित ग्रंथालयेच एक साधन म्हणून दिसून येतात. केंद्र सरकारद्वारे संचालित शिक्षणकेंद्रे किंवा प्रसिद्ध खासगी शाळा-महाविद्यालये आपल्या शैक्षणिक गरजांनुसार ग्रंथालयांचा मोठ्या प्रमाणात विकास करतात. मात्र अनेक राज्य सरकारांद्वारे संचालित अनेक सार्वजनिक ग्रंथालये, अनुदानित शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील ग्रंथालये, तसेच स्थानिक प्रशासनाची ग्रंथालयेही अनेक वर्षांपासून समस्यांशी झुंजताना दिसतात.

ग्रंथालयांच्या विकासासाठी सर्वप्रथम विकसित दृष्टिकोनाची आवश्यकता आहे; कारण आपण अनेकदा पाहतो की, ज्या महानगरपालिका किंवा नगरपालिकांचे वार्षिक बजेट हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे, तेथील ग्रंथालयांची स्थिती वर्षानुवर्षे तशीच राहिलेली आहे. सरकार सध्या ग्रंथालयांच्या विकासावर भर देण्याचा प्रयत्न करत असले, तरी विकासाचा परिणाम ग्रंथालयांशी संबंधित सर्व घटकांवर दिसून आला पाहिजे. महाराष्ट्र राज्यातील अनुदानित सार्वजनिक ग्रंथालयांचे अ, ब, क आणि ड असे चार वर्ग करण्यात आले आहेत. याच वर्गवारीनुसार ग्रंथालयीन खर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि साहित्य खरेदी केली जाते. हे जाणून कदाचित आपणास आश्चर्य वाटेल की, अ, ब, क आणि ड या वर्गांतील अनेक ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे वेतन एका मजुराच्या वेतनापेक्षाही कितीतरी पटींनी कमी आहे. तेही आजच्या काळात, जेव्हा महागाईमुळे आपण दररोज त्रस्त होतो. अशा परिस्थितीत अनेक ग्रंथालय कर्मचाऱ्यांना महिन्याला अडीच ते तीन हजार रुपये वेतन मिळते. या वेतनात आजच्या काळात जगणे शक्य आहे का? महाराष्ट्र राज्यात बहुतांश अनुदानित ग्रंथालये संस्थांद्वारे चालवली जातात. उदाहरणार्थ, येथे बहुतांश अनुदानित शाळा आणि महाविद्यालये संस्थांद्वारेच चालवली जातात. मात्र शाळा-महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांना सरकारी नियमांनुसार वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे, जेव्हा की या अनुदानित ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांना कोणतीही वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही.


अलीकडेच अशाच एका सार्वजनिक ग्रंथालयातील 'वर्ग अ – इतर' श्रेणीतील ग्रंथालय कर्मचाऱ्याशी माझे बोलणे झाले. त्यांनी सांगितले की, १९७७ मध्ये महिन्याला ५० रुपये वेतन मिळत होते, जे आता १२,००० रुपये झाले आहे. म्हणजे गेल्या ४९ वर्षांत वेतन केवळ बारा हजार रुपयांपर्यंतच पोहोचू शकले आहे. महाराष्ट्राच्या कामगार आयुक्तांनी अधिसूचित केलेले, महाराष्ट्रातील दुकाने आणि आस्थापनांमधील अकुशल कामगारांसाठीचे नवीनतम किमान वेतनही या वेतनापेक्षा जास्त आहे. आजच्या काळात कुटुंबप्रमुखाला या वेतनातून संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी सहजपणे पार पाडणे शक्य आहे का? या परिस्थितीत ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी आपल्या वास्तविक परिस्थितीची सरकारला अनेक वेळा जाणीव करून दिली; मात्र त्यांना यश मिळाले नाही. कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटना स्थापन करून मंत्र्यांची भेट घेतली, निवेदने दिली आणि आंदोलने केली; परंतु कोणताही तोडगा निघाला नाही. आता ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, योग्य तोडगा निघाला नाही, तर आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही; जगणे अतिशय कठीण झाले आहे. त्यांची मानसिकता या टोकापर्यंत पोहोचली आहे. ज्ञानरूपी भंडार समृद्ध करून आपल्यापर्यंत ग्रंथालयीन सेवा अखंडितपणे पोहोचवणाऱ्या ग्रंथालय कर्मचाऱ्यांची ही परिस्थिती आहे.

आज देशातील अनेक राज्यांमध्ये विविध क्षेत्रांतील ज्ञानकेंद्रांच्या सर्व स्तरांवर ग्रंथालय कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. जुने कर्मचारी सेवानिवृत्त होतात; मात्र त्यांच्या जागी नवीन कर्मचारी येत नाहीत, कारण अनेक वर्षांपासून पदभरती झालेली नाही. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित शाळांच्या ग्रंथालयांमध्ये शोधल्यास कदाचित एखादा कर्मचारी दिसेल; अन्यथा बहुतांश अनुदानित शाळांची ग्रंथालये कुशल कर्मचाऱ्यांशिवायच चालवली जात आहेत. महाराष्ट्रातील अनेक वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ग्रंथपालांची पदे रिक्त आहेत. अनेक विद्यापीठांमध्येही अशीच परिस्थिती आहे. गरज पडल्यास काही काळासाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नेमून कामकाज चालविले जाते. दुसरीकडे, या विषयात उच्चशिक्षित वर्गामध्ये भयावह बेरोजगारीची परिस्थिती आहे. कंत्राटी पद्धतीवरील ग्रंथालयीन कर्मचाऱ्याच्या एका छोट्या पदासाठी, ज्याचे मासिक वेतन किमान वेतनाच्या आसपास असेल, अशा पदासाठीही शेकडो उच्चशिक्षित उमेदवार रांगेत उभे असतात. २० ते २५ वर्षांपूर्वी या विषयात उच्च शिक्षण घेतलेले अनेक जण आजही या क्षेत्रातील रोजगारापासून वंचित आहेत. जीवन जगण्यासाठी ते नाइलाजाने मिळेल ते काम करतात. अलीकडेच महाराष्ट्र राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक (सम कक्ष ग्रंथपाल) पदासाठी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम ठरवण्यात आल्याच्या भ्रष्टाचाराच्या बातम्या वृत्तपत्रांत वाचल्या होत्या. अशा बातम्या नेहमीच सातत्याने येत असतात. ग्रंथालयांमध्ये कुशल कर्मचाऱ्यांची कमतरता, योग्य वेतनश्रेणीचा अभाव, ग्रंथालयांच्या विकासासाठी निधीची कमतरता, ग्रंथालयशास्त्र विषयात शिक्षण घेतलेल्या तरुणांमधील बेरोजगारी, पदभरती न होणे, भ्रष्टाचार आणि दिरंगाई या समस्या ज्ञानकेंद्रे असलेल्या ग्रंथालयांच्या विकासात अडथळा ठरतात. सरकारने या समस्यांचे लवकरात लवकर निराकरण केले पाहिजे. देशाच्या नवीन शिक्षणप्रणालीसाठी आणि समाजाला जागतिक दर्जाच्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हे आवश्यक आहे.

ग्रंथालय ही अनेक घटकांनी मिळून तयार झालेली अत्यंत महत्त्वाची साखळी आहे. त्यातील एक जरी घटक कमकुवत झाला, तरी ग्रंथालयाचा दर्जा घसरतो; कारण ग्रंथालयीन सेवा थेट बाधित होतात. सर्व घटकांची समृद्धताच समृद्ध ग्रंथालय आहे. यामध्ये दर्जेदार साहित्य सामग्री, वाचकांच्या मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी उत्तम ग्रंथालयीन सेवा, तांत्रिक आणि प्रगत साधनसंपत्ती, कुशल कर्मचारी, कर्मचाऱ्यांना योग्य वेतनश्रेणी, वेळोवेळी पदभरती, पुरेसा निधी आणि सातत्याने विकसित होत असलेल्या ग्रंथालयीन आराखड्याची अंमलबजावणी करण्याचा दृष्टिकोन अत्यंत आवश्यक आहे. या सर्व गोष्टी एकत्र आल्यास समृद्ध आणि विकसित ग्रंथालयाची संकल्पना प्रत्यक्षात साकार होते; हे प्रत्येक देशाचे, सरकारचे आणि समाजाचे उद्दिष्ट असते. आज कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ग्रंथालयांच्या विकासासाठी महत्वाचा स्तंभ ठरत आहे. समृद्धता आपल्याला विकसित समाजनिर्मितीच्या प्रगतीपथावर पुढे घेऊन जाते. प्रत्येक विद्यार्थी, प्रत्येक नागरिक आणि जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत दर्जेदार ग्रंथालयीन सेवा सहजपणे पोहोचल्या पाहिजेत; कारण माहिती आणि ज्ञानाची भूक ही प्रत्येकाची गरज आहे. हे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा ग्रंथालयातील प्रत्येक घटकाची समृद्धता वाढेल. तेव्हाच हे सर्व घटक मिळून विकसित ग्रंथालयाचे यशस्वी संचालन करतील.

लेखक
डॉ. प्रितम भि. गेडाम
मोबा.०८२३७४१७०४१

स्व.जवाहरलाल



नेहरूजी पंतप्रधान
बालका खास जीव
आठवणीत राहीलं
जनतेच्या तेआजीव

तोंडा चांदी चमचा
दीनांची कणव कीव
वेगळेचं व्यक्तीमत्व
दुःखाची ती जाणीव

पहिले पंतप्रधान ते
ठेविली समर्थ नीव
प्रगत समृद्ध देश हो
नसो कसली उणीव

व्यक्तीमत्व रे देखणे
संकल्प तसे रेखीव
दीन गरीबा करिता
कार्य करती भरीव

करारी तरीही मृदूता
शिस्त बध्द आखीव
तत्पर निर्णय क्षमता
कार्य पद्धती रेखीव

– हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

बालदिन : बालकांच्या हक्कांचा आणि उज्ज्वल भविष्याचा संकल्प


आज १४ नोव्हेंबर. हा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. नेहरूंना लहान मुलांविषयी विशेष प्रेम आणि जिव्हाळा होता. त्यामुळेच त्यांची जयंती बालदिन म्हणून साजरी करण्याची परंपरा सुरू झाली. बालदिन हा केवळ मुलांच्या आनंदाचा दिवस नसून त्यांच्या हक्कांची, शिक्षणाची, आरोग्याची आणि सुरक्षिततेची जाणीव करून देणारा दिवस आहे.

जागतिक पातळीवर २० नोव्हेंबर हा दिवस जागतिक बालदिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९५४ मध्ये सर्व देशांनी बालदिन साजरा करण्याचे आवाहन केले. जगभरातील मुलांमध्ये परस्पर सामंजस्य, बंधुभाव आणि सहकार्याची भावना वाढविणे, तसेच त्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे हा त्यामागील मुख्य उद्देश होता. २० नोव्हेंबर १९५९ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने बालहक्कांची घोषणा स्वीकारली. त्यानंतर २० नोव्हेंबर १९८९ रोजी बालहक्कविषयक आंतरराष्ट्रीय करार स्वीकारण्यात आला. या करारामुळे जगभरातील बालकांच्या हक्कांना आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाले.

भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. ते स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. नेहरूंना लहान मुलांविषयी विलक्षण प्रेम होते. मुले त्यांना प्रेमाने 'चाचा नेहरू' म्हणत. लहान मुलांच्या सहवासात त्यांना विशेष आनंद मिळत असे. मुलांना प्रेम, माया आणि सुरक्षित वातावरण मिळाले पाहिजे, असे त्यांचे मत होते. मुलांना दिलेले योग्य संस्कार आणि शिक्षण हीच देशाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे, यावर त्यांचा विश्वास होता.

आजची मुले ही उद्याच्या भारताची आधारस्तंभ आहेत. आजचे बालक उद्याचा जबाबदार नागरिक, शिक्षक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, सैनिक, उद्योजक आणि देशाचे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व असू शकते. त्यामुळे प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षण, उत्तम आरोग्य, पोषक आहार, सुरक्षित वातावरण आणि विकासाच्या समान संधी मिळणे आवश्यक आहे.

मात्र, आजही देशात अनेक बालके बालमजुरी, बालविवाह, कुपोषण, शिक्षणापासून वंचित राहणे, बालशोषण आणि आर्थिक विषमता अशा समस्यांना सामोरी जात आहेत. काही मुलांना शिक्षणासाठी शाळेत जाण्याऐवजी कामावर जावे लागते, तर काही मुलांना बालपणातील



आनंदही अनुभवता येत नाही. ही परिस्थिती बदलणे ही केवळ शासनाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

प्रत्येक मुलाला शिक्षणाचा, खेळण्याचा, आनंदाने जगण्याचा आणि स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याचा अधिकार आहे. मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे लादण्याऐवजी त्यांच्या आवडी-निवडी, कलागुण आणि क्षमतांना प्रोत्साहन दिले पाहिजे. पालकांनी मुलांशी संवाद साधला पाहिजे, त्यांना समजून घेतले पाहिजे आणि त्यांच्यामध्ये माणुसकी, सामाजिक बांधिलकी, सहिष्णुता आणि इतरांविषयी आदराची भावना रुजवली पाहिजे.

बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. समाजातील वंचित आणि गरजू मुलांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. प्रत्येक बालकाला आनंदी, सुरक्षित आणि सन्मानाचे जीवन मिळाले तरच खऱ्या अर्थाने बालदिन साजरा केल्याचे समाधान मिळेल.

बालपण हा आयुष्यातील सर्वांत सुंदर आणि निरागस काळ असतो. हा काळ प्रत्येक मुलाला आनंदाने जगता आला पाहिजे. कारण बालकांचे आज सुरक्षित असेल, तरच देशाचे उद्याचे भविष्य उज्ज्वल असेल.

देशातील सर्व बालकांना बालदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

- श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

दिनांक १६ नोव्हेंबर रोजी ठाण्यातील काही भागात पाणी नाही



अक्षराज : जे.के.पोळ

दि.१३, ठाणे : अलनिनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे दिनांक ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत काटकसरीने, प्राधान्यक्रमाने व नियोजनबद्ध पध्दतीने व्यवस्थापन करुन पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता निश्चित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आहे. संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी पूर्वतयारीच्या उपाययोजना व उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वितरित करण्यात येणाऱ्या पाण्याचे १० टक्के कपात करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने स्टेम प्राधिकरण तसेच ठाणे महानगरपालिकेची स्वत: ची पाणीपुरवठा योजनेमार्फत होणारा पाणीपुरवठा सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९.०० वा. ते मंगळवार दि.१७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९.०० पर्यंत घोडबंदर रोड, लोकमान्यनगर, वर्तकनगर, साकेत, ऋतूपार्क, जेल, गांधीनगर, रुस्तमजी, सिध्दांचल, इंदिरानगर, रुपादेवी, श्रीनगर, समतानगर, सिध्देश्वर, इटरनिटी, जॉन्सन, मुंब्रा व कळव्याच्या भागात २४ तासांसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. तसेच यापुढे प्रत्येक सोमवारी सकाळी ९.०० ते मंगळवारी ९.०० असा २४ तासांचा शटडाऊन घेण्यात येणार आहे.तरी सदर पाणी कपातीच्या कालावधीत नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते पालमच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचे लोकार्पण

शहरातील विविध विकासकामांचाही शुभारंभ; बसस्थानकाचा प्रश्न मार्गी लावण्याचा संकल्प



अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.१३, पालम (परभणी) : पालम शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या २.५ दशलक्ष लिटर क्षमतेच्या नवीन जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते आज पालम येथे उत्साहात संपन्न झाले. यावेळी शहरातील विविध विकास कामांचाही शुभारंभ करण्यात आला.या कार्यक्रमाला नगरपंचायतीचे मुख्याधिकारी युवराज पौळ, नगराध्यक्ष प्रतिनिधी जिया खां पठाण, माजी नगराध्यक्ष वसंतराव शिरस्कर, उपनगराध्यक्ष भास्करराव शिरस्कर, संतोष मुंडे यांच्यासह सर्व नगरसेवकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी पालम शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. शहरातील उर्वरित विकासकामांना आगामी काळात गती देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच पालम शहराजवळील जांभूळ बेट या पर्यटनस्थळाचा विकास करण्यासाठी पालम येथील बस स्थानकाचा प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रम ाला आ.गुट्टे काका मित्र मंडळाचे प्रभारी माधवराव गायकवाड, गुलाबराव सिरस्कर, जिल्हाध्यक्ष संदीप अलनुरे, बाळासाहेब ढोले, इमदाद खां पठाण, शेख गौस भाई, डॉ.इप्पर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, नगरपंचायतीचे अधिकारी व कर्मचारी, शहरातील नागरिक, व्यापारी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चंद्रपूर जिल्ह्यात सीसीआयची कापूस खरेदी केंद्रे तातडीने सुरु करा

मुख्यमंत्री यांच्याकडे दिनेश चोखारे यांची मागणी



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१३, चंद्रपूर : कापूस हंगाम सुरु झाला असून, चंद्रपूर जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा कापूस विक्रीसाठी तयार आहे. मात्र, अद्याप भारतीय कापूस महामंडळाच्या माध्यमातून शासकीय कापूस खरेदी केंद्रे सुरु झाली नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांना कमी दरात कापूस विकण्याची वेळ येऊ नये आणि त्यांचे आर्थिक नुकसान टाळावे. यासाठी जिल्ह्यात सीसीआयची कापूस खरेदी केंद्रे तातडीने सुरु करण्यात यावीत, अशी मागणी कॉंग्रेस नेते, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा संचालक दिनेश दादापाटील चोखारे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. चंद्रपूर जिल्हा हा प्रमुख कापूस उत्पादक जिल्हा असून, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी कापूस पिकांवर अवलंबून आहेत. सध्या कापूस हंगाम सुरु झाल्याने शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी कापूस उपलब्ध आहे. मात्र, शासकीय खरेदी केंद्रे सुरु होण्यास विलंब झाल्यास शेतकऱ्यांना नाइलाजास्तव खाजगी व्यापाऱ्यांकडे कमी दराने कापूस विकावा लागू शकतो. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना शासनाने निश्चित केलेला हमीभाव मिळावा, कापूस विक्रीसाठी होणारी गैरसोय दूर व्हावी आणि खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी संभाव्य आर्थिक पिळवणूक थांबावी, यासाठी जिल्ह्यातील आवश्यक त्या ठिकाणी सीसीआयची कापूस खरेदी केंद्रे तातडीने सुरु करावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. याशिवाय कापूस खरेदीसाठी आवश्यक शेतकरी नोंदणी, कापसाची गुणवत्ता तपासणी, वजनकाटा तसेच इतर प्रशासकीय सुविधा त्वरित उपलब्ध करुन द्याव्यात. जिल्ह्यातील प्रत्येक कापूस उत्पादक शेतकऱ्याला शासकीय खरेदीचा लाभ मिळेल. यासाठी संबंधित यंत्रणांनी योग्य नियोजन करावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या गंभीर प्रश्नांची मुख्यमंत्री महोदयानी तातडीने दखल घेऊन संबंधित विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत आणि चंद्रपूर जिल्ह्यात सीसीआयची कापूस खरेदी केंद्रे लवकरात लवकर सुरु करण्यासाठी कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी दिनेश दादापाटील चोखारे यांनी केली आहे.

पारनेर तालुक्यात लोकप्रतिनिधींची विकासकामे कमी पण

सोशल मीडियावर प्रसिद्धीचा भडिमार जास्त...

पारनेर तालुक्यात सध्या माजी,विद्यमान खासदार, आम दार, नगरसेवक, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्य यांच्या विकासकामांपेक्षा सोशल मीडियावरील जाहिरातबाजी'वर जास्त भर असल्याची नागरिकांमध्ये दबक्या आवाजात चर्चा रंगत असून सोशल मीडियावरील रिल मध्येच फक्त विकास दिसत असून ग्राउंड रियालिटी मात्र वेगळीच आहे.

पारनेर तालुक्यातील गावोगावी रखडलेली विकास कामे, अपूर्ण रस्ते, पाणीटंचाई, गटार, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि मूलभूत सुविधांच्या समस्या कायम असताना लोकप्रतिनिधी मात्र सोशल मीडियावरील रिल, फोटोसेशन अन् बॅनरबाजी याच्यात जास्त व्यस्त असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. तालुक्यातील ग्रामीण अनेक भागांत आजही नागरिकांना चांगले रस्ते, शुद्ध पाणी, सुरळीत वीजपुरवठा, आरोग्य सुविधा, शाळांची दुरुस्ती, गावातील स्वच्छता, शेतकऱ्यांना पाणी आणि शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ यासाठी झगडावे लागत आहे. मात्र या प्रश्नांवर ठोस भूमिका घेण्याऐवजी काही लोकप्रतिनिधींचा भर प्रत्येक छोट्या – मोठ्या कार्यक्रमाचे फोटो टाकणे, शुभेच्छा देणे, उद्घाटनाचे फोटो प्रसिद्ध करणे आणि सोशल मीडियावर कामाचा देखावा निर्माण करणे यावरच भर असल्याची टीका होत आहे. निवडणुकीपूर्वी मोठमोठी आश्वासने देणारे अनेक लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर प्रत्यक्ष जनतेत कमी आणि मोबाईलच्या स्क्रीनवर जास्त दिसू लागले आहेत. गावातील एखादी छोटी भेट, एखाद्या कागद दिला, कुठे उपस्थिती लावली किंवा अधिकाऱ्यांसोबत फोटो काढला तरी त्याचे मोठे पोस्टर करून सोशल मीडियावर प्रसार केला जातो. परंतु त्या भेटीतून प्रत्यक्ष किती कामे मार्गी लागली, किती निधी आला, किती कामे पूर्ण झाली,याचा हिशोब मात्र जनतेसमोर मांडला जात नाही.

पारनेर तालुक्यातील अनेक गावांमध्ये आजही अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याची अनियमि तता, गटारांची समस्या,शेतरस्त्यांचे प्रश्न, अवैध माती व वाळू उपसा, वाहतूक कोंडी, आरोग्य उपकेंद्रांची कमतरता आणि शाळांच्या पायाभूत सुविधांबाबत नागरिकांची नाराजी दिसून येते. या प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला धारेवर धरण्याची गरज असताना अनेक ठिकाणी केवळ निवेदन, फोटो आणि पोस्ट एवढ्यावरच विषय संपवला जात असल्याची भावना जनतेत निर्माण झाली आहे. तालुक्यातील जनतेला आता केवळ सोशल मीडियावरील चमकदार पोस्ट नकोत, तर प्रत्यक्ष जमिनीवर दिसणारी कामे हवी आहेत. लोकप्रतिनिधींनी किती उद्घाटने केली. यापेक्षा किती कामे पूर्ण केली, किती गावांना निधी मिळवून दिला, किती समस्या कायमस्वरूपी सोडवल्या आणि किती नागरिकांना दिलासा दिला, याची उत्तरं देण्याची वेळ आता आली आहे. तसेच नागरिकांमध्ये अशीच चर्चा आहे की, काही लोकप्रतिनिधींच्या सोशल मीडिया पेजवर विकासाचा महापूर दिसतो, मात्र गावात गेल्यावर वास्तव वेगळेच दिसते. फोटोमध्ये विकास आणि प्रत्यक्षात समस्या, अशी परिस्थिती अनेक ठिकाणी दिसत असल्याने जनतेत असंतोष वाढत आहे. जाहिरातबाजी करून काही काळ जनतेचे लक्ष विचलित करता येईल, पण मूलभूत प्रश्न कायम राहिले तर जनतेचा रोष वाढणार हेही तितकेच खरे आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूम ीवर लोकप्रतिनिधींनी आता आत्म परीक्षण करण्याची गरज आहे. सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवणे चुकीचे नाही, मात्र प्रसिद्धीच्या मागे प्रत्यक्ष काम असणे गरजेचे आहे. अन्यथा काम कमी आणि गाजावाजा जास्त अशी प्रतिमा सगळ्याच लोकप्रतिनिधींसाठी अडचणीची ठरु शकते.

पारनेर तालुक्यातील जनता आता पुर्वीसारखी केवळ आश्वासनांवर विश्वास ठेवणारी राहिलेली नाही. नागरिकांना आता कामाचा पुरावा हवा आहे. सोशल मीडियावर टाकलेल्या पोस्टपेक्षा गावातील रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि शेतकरी प्रश्न यावर केलेली ठोस कामगिरीच खरी प्रसिद्धी ठरणार आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी आता फोटोसेशनपेक्षा विकासकामांना प्राधान्य द्यावे, अशी स्पष्ट मागणी तालुक्यातून होत आहे.

- वसंत रांधवण

दुर्गम गावांतील प्रवाशांना एसटीची प्रतीक्षा ! अपुऱ्या बसफेऱ्यांमुळे प्रवाशांची गैरसोय

अक्षराज : वसंत रांधवण

दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) : पारनेर तालुक्यातील अनेक दुर्गम गावांतील नागरिकांना आजही नियमित एसटी बससेवेची प्रतीक्षा करावी लागत आहे. अपुऱ्या बसफेऱ्यांमुळे विद्यार्थी, रुग्ण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. तालुक्याच्या ठिकाणी विविध कामांसाठी जाण्यासाठी नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून, त्यासाठी जास्त भाडे मोजावे लागत आहे. त्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांसाठी सार्वजनिक वाहतूक हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे.

पारनेर तालुक्यातील अनेक गावे दुर्गम भागात वसलेली आहेत. या गावांतील नागरिकांना शासकीय कामे, बाजारहाट, आरोग्य उपचार, शिक्षण आणि इतर आवश्यक कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. मात्र, संबंधित मार्गांवर एसटीच्या नियमित आणि पुरेशा फेऱ्या नसल्याने नागरिकांना प्रवासाचे नियोजन करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

खासगी वाहनांचा आधार, मात्र भाडे जास्त

एसटी बस वेळेवर किंवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने नागरिकांना खासगी प्रवासी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. दुर्गम भागात खासगी वाहनांची संख्या कमी असल्याने वाहन मिळण्यासाठीही बराच वेळ प्रतीक्षा करावी लागते. त्यातच खासगी वाहनचालकांकडून आकारले जाणारे भाडे तुलनेने अधिक असल्याने सर्वसाम



न्य नागरिकांच्या खिशाला मोठा आर्थिक फटका बसतो.

रुग्णांना उपचारासाठी तालुक्याच्या ठिकाणी नेताना ही समस्या अधिक गंभीर होते. तातडीच्या प्रसंगी वाहन उपलब्ध होणे आणि त्याचे वाढीव भाडे देणे, दोन्ही बाबी कुटुंबीयांसाठी मोठे आव्हान ठरतात.

विद्यार्थ्यांसह महिला, ज्येष्ठांचीही गैरसोय

बससेवेअभावी शिक्षणासाठी नियमित प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांचीही मोठी गैरसोय होत आहे. बसच्या अपुऱ्या फेऱ्यांमुळे विद्यार्थ्यांना शाळा – म हाविद्यालयात जाण्या येण्यासाठी पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागतो. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीही ही समस्या अधिक त्रासदायक ठरत आहे. खासगी वाहनांची वाट पाहणे, जास्त भाडे देणे किंवा उपलब्ध वाहनांमध्ये गर्दीतून प्रवास करणे अशा अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागत आहे.

बसच्या प्रतीक्षेत प्रवासी ताटकळत

तालुक्यातील विविध मार्गांवर बस फेऱ्या अपुऱ्या असल्याने प्रवाशांना बसच्या प्रतीक्षेत बराच वेळ ताटकळत उभे राहावे लागते. काही ठिकाणी बसथांबे किंवा निश्चित वाहतूक सुविधा नसल्याने प्रवाशांना रस्त्याच्या कडेला उभे राहून बसची वाट पाहावी लागते.

बसची पुढील फेरी कधी येणार,याची निश्चित माहिती नसल्याने नागरिकांच्या दैनंदिन काम काजावरही परिणाम होतो. त्यामुळे बसफेऱ्यांचा अभाव दूर कधी होणार? असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. पारनेर आगाराने तातडीने लक्ष द्यावे

दुर्गम भागातील नागरिकांची वाहतूक समस्या लक्षात घेऊन राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगाराने संबंधित मार्गांवर पुरेशा एसटी बस फेऱ्या सुरू कराव्यात, अशी मागणी होत आहे. विशेषतः विद्यार्थी, रुग्ण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन बसफेऱ्यांचे वेळापत्रक निश्चित करावे अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

नियमित आणि पुरेशी एसटी बससेवा उपलब्ध झाल्यास दुर्गम गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ आणि शासकीय सेवांशी संपर्क सुलभ होण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करणे आवश्यक असल्याने पारनेर आगाराने या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

दिव्यांगत्वावर मात करत कर्तृत्वाचा डोंगर सर,

सांगलीच्या अपंग सेवा केंद्राकडून 'जिद्दी पुरस्कार' देऊन गौरव

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१३, पुणे : मनात जिद्द असेल तर आकाशही ठेंगणे वाटते', याचा प्रत्यय आकाश पवार यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासातून येतो. जन्मतःच दिव्यांगत्व वाट्याला आले, शरीराला साथ देणाऱ्या पायांची उणीव भासली; मात्र मनात उभ्या असलेल्या स्वप्नांना त्यांनी कधीही अपंग होऊ दिले नाही. परिस्थितीपुढे हार न मानता जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर त्यांनी यशाची गरुडभरारी घेतली आहे. त्यांच्या या असामान्य कर्तृत्वाची दखल घेत सांगली येथील अपंग सेवा केंद्राने २०२३ च्या जागतिक दिव्यांग दिनानिमित्त त्यांना प्रतिष्ठित 'जिद्दी पुरस्कार' देऊन सन्मानित केले.

आकाश पवार हे अवघ्या २७ वर्षांचे असून जन्मतःच दिव्यांग आहेत. कमरेखालील शरीररचनेमुळे त्यांना साम ान्य व्यक्तींप्रमाणे चालता येत नाही. पायांचे पंजे कमरेला चिकटलेले असल्याने दोन्ही हातांच्या साहाय्याने ते हालचाल करतात. मात्र, 'अडचणी माणसाला संपवण्यासाठी नाही, तर घडवण्यासाठी असतात', हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. शारीरिक अस्वास्थ्याला कधीही आपल्या प्रगतीच्या आड येऊ न देता त्यांनी प्रत्येक आव्हानाला लढा दिला आहे.



केवळ शारीरिक संघर्ष नव्हे, तर व्यावसायिक व कलाक्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आकाश यांनी इंग्रजी व मराठी टायपिंग, डीटीपी, संगणक अभ्यासक्रम आणि मोबाइल रिपेअरिंगचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, संगीताच्या चार परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण करत त्यांनी कलाक्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली. नाटक आणि गायनात सक्रिय सहभाग घेत त्यांनी आपल्यातील उपजत कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. त्यांच्या या बहुआयामी प्रतिभेचा सर्वोच्च क्षण राजस्थानमधील उदयपूर येथे पाहायला मिळाला. तिथे आयोजित राष्ट्रीय नाट्यस्पर्धेत त्यांनी क्रांतीकारक मंगळ पांडे यांची अत्यंत ज्युनिअर आणि प्रभावी भूमिका साकारली. या पात्रात त्यांनी घेतलेली मेहनत आणि अभिनय कौशल्याची पावती म्हणून त्यांना सर्वात कमी वयात नाट्यशाळेचा विशेष पुरस्कार मिळवण्याचा बहुमान मि ळाला. शारीरिक मर्यादांवर मात करत आंतरराज्य पातळीवर मिळवलेले हे यश त्यांच्या अदम्य आत्मविश्वासाचे आणि जिद्दीचे जिवंत प्रतीक आहे.

सांगली येथील अपंग सेवा केंद्रात पार पडलेल्या या गौरव सोहळ्यात त्यांना ११ हजार रुपयांचा धनादेश, मानचिन्ह, सन्म ानपत्र, शाल व श्रीफळ प्रदान करण्यात आले. या सत्काराने त्यांच्या कार्यावर अधिकृत मोहोर उमटवली आहे.

'जिथे इच्छा, तिथे मार्ग' ही म्हण आकाश पवार यांच्या जीवनाला तंतोतंत लागू पडते. शरीराच्या मर्यादांना झुगारून त्यांनी कर्तृत्वाची जी उंची गाठली आहे, ती आजच्या तरुण पिढीसाठी आणि नैराश्यात गेलेल्या प्रत्येकासाठी प्रेरणेचा दीप ठरत आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात कशी करावी, याचे उत्तम उदाहरण म्हणजे आकाश पवार होत. खऱ्या अर्थाने त्यांनी नावाप्रमाणेच यशाच्या अनंत आकाशाला गवसणी घातली आहे.

आदिवासींचा गौरवशाली इतिहास, संस्कृती आणि महापुरुषांचा त्याग नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प

जनजातीय गौरव दिनाच्या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे - आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१३, चंद्रपूर : आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, समृद्ध संस्कृती, परंपरा आणि स्वातंत्र्यलढ्यातील महापुरुषांचे अतुलनीय योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, हा जनजातीय गौरव दिन साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश आहे. क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांनी जल, जंगल, जमीन आणि निसर्गाच्या संरक्षणासाठी दिलेला संघर्ष व त्याग संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपत आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे. तसेच १५ नोव्हेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जनजातीय गौरव दिनाच्या उपक्रमात सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०२१मध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. त्यानुसार यंदा भगवान बिरसा मुंडा यांची १५१वी जयंती देशभरात जनजातीय गौरव दिन म्हणून साजरी करण्यात येत आहे. यावर्षी राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाच्या आयोजनाचा मान गडचिरोली जिल्ह्याला मिळाला असून, १५ नोव्हेंबर रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यक्रमाला मार्गदर्शन करणार आहेत. तसेच महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांची प्रत्यक्ष उपस्थिती नियोजित आहे.भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासींचे हक्क, अस्मिता आणि जल, जंगल, जमिनीच्या संरक्षणासाठी ऐतिहासिक संघर्ष केला. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक आदिवासी क्रांतिवीरांनी बलिदान दिले.आदिवासी संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि गौरव करण्यासाठी जनजातीय गौरव दिन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या निमित्ताने १५ नोव्हेंबर रोजी देशभरातील गावे, ग्रामपंचायती, शासकीय कार्यालये आणि विविध संस्थांमध्ये भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात येणार असल्याचे डॉ. उईके यांनी सांगितले. जनजातीय गौरव दिनानिमित्त ११ते १८नोव्हेंबर २०२६या कालावधीत राज्यभर सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात एकही पात्र आदिवासी बांधव शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

आधार कार्ड, जन्म-मृत्यू दाखले, ओळखपत्रे, विविध प्रमाणपत्रे तसेच शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. विशेषतः माडिया, गोंड, कोलाम, कातकरी आणि पारधी समाजातील नागरिकांसाठी विशेष शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यातील चार अपर आयुक्त कार्यालये आणि ३० एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांच्या माध्यमातून सेवा सप्ताहाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून, दुर्गम व अतिदुर्गम भागातील नागरिकांपर्यंत शासकीय सेवा पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भरआदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास हा आदिवासी विकास विभागाचा केंद्रबिंदू आहे.

राज्यातील सुमारे ५००शासकीय आश्रमशाळा, ४९१शासकीय वसतिगृहे तसेच अनुदानित आश्रमशाळांच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे ५ लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी पात्रताधारक शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तसेच चार आदिवासी अप्पर आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून एक हजार विद्यार्थ्यांना नीट आणि जेईईया स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी दोन वर्षांचे विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षण, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रात पुढे यावेत, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे डॉ. उईके यांनी सांगितले. वनहक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीला प्राधान्यआदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक आणि सामूहिक वनहक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. पात्र आदिवासी बांधवांना वनहक्क पट्टे मिळावेत आणि कोणीही आपल्या न्याय्य हक्कांपासून वंचित राहू नये, यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. पेसा कायद्यांतर्गत आदिवासी क्षेत्रातील हक्कांचे संरक्षण करण्यावर भर देण्यात येत असून, पेसा अंतर्गत भरतीचा मार्ग आगामी सहा महिन्यांत मोकळा करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. 'बिरसा कला संगम' मधून आदिवासी कलागुणांना हक्काचे व्यासपीठआदिवासी समाजातील पारंपरिक कला, संस्कृती, नृत्य, वेशभूषा आणि विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी 'बिरसा कला संगम' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



या उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी तरुण-तरुणींना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या उपक्रमासाठी सुमारे २५०० ऑनलाइन प्रवेशिका प्राप्त झाल्या असून, गडचिरोली येथील राज्यस्तरीय कार्यक्रमात आदिवासी वेशभूषा, पारंपरिक नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. ६८हजार महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणआदिवासी महिला केवळ रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या न राहता इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या उद्योजिका व्हाव्यात, या उद्देशाने 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सबलीकरण योजना' राबविण्यात येत आहे.

कातकरी, कोलाम, माडिया आणि पारधी समाजासाठी विशेष पॅकेजमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने कातकरी, कोलाम, माडिया आणि पारधी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र विशेष पॅकेज जाहीर केले आहे. या समाजघटकांना शिक्षण, रोजगार, उपजीविका आणि विविध विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

१५ नोव्हेंबर रोजी जनजातीय गौरव दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करून त्यांच्याह विचारांचा जागर करावा. तसेच ११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान आयोजित सेवा सप्ताहातील विविध उपक्रम, शासकीय योजनांची शिबिरे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले आहे.

थोडक्यात बातम्या

शंभू कोकाटे यांची आयडॉल टीचर म्हणून निवड



अक्षराज : सुनिल फर्डे

दि.१३, शहापूर (ठाणे) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कमालपूर केंद्र आशिव तालुका औसा जिल्हा लातूर येथील उपक्रमशील शिक्षक शंभू गंगाराम कोकाटे यांची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यावतीने आयडॉल टीचर म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, संशोधनात्मक व प्रशासकीय कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे.कोकाटे सरांनी एम.ए इंग्रजी व समाजशास्त्र या विषयात शिक्षण पूर्ण केले असून, त्यांच्या चौतिश वर्षाच्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी केंद्रीय प्राथमिक शाळेत प्रभारी मुख्याध्यापक म्हणून उत्कृष्ट काम केले. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आदिवासी अतिदुर्गम भागात अनेक विद्यार्थ्यांना नोकर्या मिळवून दिल्या. अनेक मुलांची शैक्षणिक फीस भरली. अनेकांना आजारपणात मदत केली. त्यांचे अनेक विद्यार्थी एम.बी.बी.एस. व एम.डी. झाले. पन्नासपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात त्यांनी आणले. चौथी पर्यंतच्या दोन शाळेला त्यांनी सातवीपर्यंतचे वर्ग जोडले. बालवाडी, मिनी अंगणवाडी चे रूपांतर अंगणवाडीत केले. केंद्रातील तेरा शाळेंना दरवर्षी सी.एस.आर. च्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य व भौतिक सुविधेसाठी लाखो रुपये मिळवून दिले. कल्याण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नडगाव नं दोन या शाळेला आय.एस.ओ.नामांकन मिळवून दिले. त्यांचे आजपर्यंत सहा ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. राष्ट्रीय शौर्य पदक मिळालेल्या धाडसी हलीचे हाल होत होते, तिला सरांनी घर मिळवून दिले. तसेच शिपाई पदाची नोकरी मिळून दिली. सरांनी राज्य, विभाग, स्तरावर प्रशिक्षण घेऊन जिल्हास्तर, तालुकास्तर व केंद्रस्तरावर सुलभूक म्हणून कार्य केले आहे. सध्याच्या कार्यरत शाळेचा कायापालट करुन विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकसित केली आहे. त्यांची राज्यस्तरावर आयडॉल टिचर म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दिवाळीच्या फटाक्यानी घेतला चिमुकलीचा जीव फटाक्यांमुळे रस्त्यावरील गिट्टी लागल्याने मृत्यू



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१३, चंद्रपूर : चंद्रपूर शहरातील गजानन मंदिर परिसरात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. रस्त्यावर फोडण्यात आलेल्या फटाक्यामुळे उसळलेली गिट्टी डोक्याला लागल्याने पाच वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू दिवाळीच्या ८ नोव्हेंबर रोज रविवार ला सायंकाळी ९ ते ९.३० च्या दरम्यान झाला आहे. कृष्णली ठोंबरे (५) असे मृत बालिकेचे नाव असून, ती आपल्या वडिलांसोबत दुचाकीने आत्याकडे जात होती. रस्त्यावर काही मुले फटाके फोडत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने तिच्या वडिलांनी दुचाकी थांबवली होती.

मात्र त्याचवेळी झालेल्या मोठ्या स्फोटामुळे रस्त्यावरील गिट्टी उडून थेट कृष्णलीच्या डोक्याला लागली आणि ती गंभीर जखमी झाली. या अपघातानंतर तिच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाल्यामुळे तिला तातडीने खासगी डॉक्टरांकडे उपचारासाठी नेण्यात आले. परंतू उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले. दिवाळीचा आनंद साजरा करताना फटाके फोडण्याच्या निष्काळजीपणामुळे एका निष्पाप बालिकेला आपला जीव गमवावा लागल्याने या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

खेळ, कला आणि बालसुरक्षेचा संगम! 'स्लम टू स्टेडियम'मध्ये १२०० मुलांचा उत्स्फूर्त सहभाग

अक्षराज : अभिनव येलवे

दि.१३, माटुंगा (मुंबई) : मुलांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्यातील क्रीडा कौशल्य विकसित व्हावे आणि बालसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने जीवन धारा संस्थेच्या वतीने 'स्लम टू स्टेडियम २०२६' या विशेष कार्यक्रमाचे आयोजनमाटुंगा येथील डॉन बॉस्को शाळेच्या परिसरात करण्यात आले होते. बालसुरक्षा ही या कार्यक्रमाची मुख्य संकल्पना होती. मुंबईतील विविध भागांतील वस्त्या आणि सामाजिक संस्थांमधून आलेल्या सुमारे १२०० मुलांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मुलांसाठी आयोजित करण्यात आलेले विविध बौद्धिक खेळांचे स्टॉल आणि सांस्कृतिक उपक्रम. मुलांनी नृत्य, नाटक, गायन आणि चित्रकलेच्या माध्यमातून आपल्यातील कलागुणांचे सादरीकरण केले. मुलांना स्वतःची कला व्यक्त करण्यासाठी आणि आत्मविश्वासाने व्यासपीठावर येण्याची संधी मिळावी, यासाठी जीवन धारा संस्थेने विशेष मंच उपलब्ध करून दिला होता. यासोबतच मुलांना बालसुरक्षेचे महत्त्व समजावे, तसेच व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा, यासाठी जनजागृतीपर स्टॉल उभारण्यात आले होते. विशेष गरजा असलेल्या आणि दिव्यांग मुलांनाही क्रीडा क्षेत्रात समान संधी मिळावी, या उद्देशाने हँडबॉल आणि व्हीलचेअर बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सर्वसमावेशक सहभाग आणि समान संधीचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

जीवन धारा ही संस्था गेल्या २९ वर्षांपासून मुंबईतील मानखुर्द आणि गोवंडी परिसरात सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. शिक्षण, व्यावसायिक कौशल्य विकास, व्यसनमुक्ती, बालसंरक्षण आणि क्रीडा या विषयांवर संस्था प्रामुख्याने १८ वर्षांखालील मुलांसोबत काम करते. संस्थेच्या विविध अभ्यास केंद्रांच्या माध्यमातून स्टडी क्लासेस, जीवन कौशल्य प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, बाल संसद आणि फुटबॉल प्रशिक्षण असे उपक्रम राबविले जातात.

या माध्यमातून सुमारे २५०० मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था प्रयत्नशील आहे. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असलेल्या गरजू मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य आणि रेशनच्या माध्यमातूनही मदत केली जाते. तसेच शिलाई, टेलरिंग आणि संगणक प्रशिक्षणाच्या माध्यमातून युवक-युवतींना व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबनाच्या दिशेने प्रोत्साहित केले जाते. संस्थेच्या या उपक्रमांचा



लाभ घेत अनेक मुलांनी शिक्षण आणि करिअरच्या क्षेत्रात आपली वाटचाल सुरू केली आहे.

मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना विविध संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा, यासाठी जीवन धारा संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या 'स्लम टू स्टेडियम २०२६' या कार्यक्रमाने खेळ, कला, आनंद आणि बालसुरक्षा यांची सांगड घालत मुलांना एक वेगळा अनुभव दिला. केवळ स्पर्धा आणि मनोरंजनापुरता मर्यादित न राहता प्रत्येक मुलाला सुरक्षित वातावरण, समान संधी आणि स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, हा या कार्यक्रमाचा मुख्य संदेश ठरला.

'युवा कार्यसम्राट पुरस्कार २०२६' ने आकाश बाबाजी पाटील यांचा गौरव



अक्षराज : विनोद वास्कर

दि.१२, देसाई गाव (ठाणे) : देसाई वेताळपाडा येथे ओमकार नादब्रम्ह संगीत शिक्षण संस्था – महाराष्ट्र कलामंच यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'दिवाळी पहाट २०२६' या सांगीतिक कार्यक्रमात आकाश बाबाजी पाटील यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'युवा कार्यसम्राट पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात अभंगवाणी, भावगीते आणि भक्तिगीतांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध केले. दिवाळीच्या मंगलमय वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आकाश बाबाजी पाटील हे दि. ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तसेच बी. के. फाउंडेशनचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक उपक्रम आणि व्यावसायिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सन्मानामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने आणि नव्या उमेदीने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली असल्याची भावना आकाश पाटील यांनी व्यक्त केली. तसेच हा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे आभार मानले.

या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा गौरव होत असून विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नगरसेवक बाबाजी पाटील ॲक्शन मोडवर

अक्षराज : विनोद वास्कर

दि.१३, पडलेगांव (ठाणे) : प्रभाग क्र. २९ मधील पाणीपुरवठ्याच्या समस्या सोडवण्यासाठी नगरसेवक बाबाजी पाटील यांनी पाणी खात्याचे अधिकारी सागर गोसावी व संबंधित वॉलमन यांच्यासमवेत विविध परिसरांचा पाहणी दौरा केला.

महाराष्ट्रातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, नागरिकांना पाण्याचा पर्यायी स्रोत उपलब्ध व्हावा, या उद्देशाने पडले गाव, मोठे देसाई, वेताळपाडा, पाटीलपाडा, तांबडीचा पाडा, खिडकाळी, डायघर व खान कंपाउंड परिसरातील विहिरींची प्रत्यक्ष पाहणी नगरसेवक बाबाजी पाटील यांनी अधिकाऱ्यांना घेऊन केली.

या विहिरींची स्वच्छता व आवश्यक दुरुस्ती करून पंप आणि पाण्याच्या टाक्या बसवण्याचा



प्रस्ताव आगामी महासभेत मांडण्यात येणार आहे, असे नगरसेवक बाबाजी पाटील यांनी यावेळी सांगितले.

यासोबतच पडले गावातील पाटील आळीमधील अपुरा पाणीपुरवठा व अनधिकृत नळजोडण्यांचा प्रश्न, तसेच खिडकाळी मंदिर ते पडले गाव या जलवाहिनीच्या अपूर्ण कामाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नवीन जलवाहिनीचे उर्वरित काम येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन पाणी खात्याचे अधिकारी सागर गोसावी यांनी दिले.

या सर्व उपाययोजनांमुळे पाणीपुरवठ्याचा दाब वाढण्यास आणि नागरिकांच्या पाणी समस्या कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. प्रभागातील प्रत्येक नागरिकाला पुरेसा पाणीपुरवठा व्हावा, यासाठी या कामांचा सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे नगरसेवक बाबाजी पाटील यांनी सांगितले.

या पाहणी दौऱ्यादरम्यान पडले गावातील तुकाराम म्हात्रे, सावन ठाकूर, तुषार म्हात्रे, नथू पाटील, जगन्नाथ पाटील, माणिक पाटील यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.